| | |
|---|---|
| MHKO120000812026 | **नियमित फौजदारी खटला क्र.१५/२०२६**<br>**महाराष्ट्र शासन**<br>**वि.**<br>**सयाजी रंगराव पाटील** |

## निशाणी १ वरील आदेश

प्रस्तुतच्या खटल्यामध्ये असा आरोप करण्यात आला की, दि.१४/०९/२०२४ रोजी प्रस्तुतच्या खटल्यातील फिर्यादी या घरी एकट्या असताना आरोपी त्यांच्या घराच्या पाठीमागील शेड उभारत असताना आडवा पत्रा मारु नका, अशी फिर्यादी म्हणाली. त्यावेळी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली व धमकी देखील आरोपीने फिर्यादीला दिली. तसेच फिर्यादीच्या डाव्या कानावर मारुन फिर्यादीचा हात धरून तिची साडी ओढून तिचा ब्लाऊज फाडून तिच्या मनास लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले व फिर्यादीचा मुलगा शुभम तिथे आल्यावर आरोपीने त्यास देखील मारहाण केली.

२. तपासाअंती आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४, ११५(२) ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा केला. प्रस्तुच्या प्रकरणामध्ये फिर्यादीचा हात धरून तिची साडी ओढली व ब्लाऊज फाडला व मनास लज्जा निर्माण होईल असे वर्तन केले या आरोपाच्या अनुषंगाने भारतीय न्याय संहिता कलम ७५ (i) हे लागू प्रथमदर्शनी लागू पडत आहे असे या न्यायालयाचे मत

आहे व त्यामुळे त्या कलमा बाबतीत देखील प्रोसेस इशू करणे जरुरीचे वाटत आहे. सबब, मी खालील आदेश पारित करतो.

**आदेश**

आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४, ७५, ११५(२) ३५१(२), ३५२ बाबतीत प्रोसेस इशू करण्यात येते.

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.07.02 17:10:57 +0530

(एन. डी. रुद्रभटे)

**दिनांक :** ०२/०७/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
गारगोटी